# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akola.nic.in


---

**क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि-541/2020** **दिनांक: 08/07/2020**

---

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-336/2020 दिनांक 21.05.2020
5. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र. No.DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 31 मे 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-361/2020 दिनांक 31.05.2020
7. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-464/2020 दिनांक 03.06.2020
8. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 कलम 144
9. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पूनर्वसन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 29/06/2020
10. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-464/2020 दिनांक 02.06.2020
11. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पूनर्वसन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 06.07.2020
12. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पूनर्वसन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 07.07.2020

**दिनांक 09 जूलै 2020 पासून दुकाने/आस्थापना सकाळी 9.00 ते सायं. 7.00 वाजेपर्यंत सुरु ठेवणे बाबत.**

# आदेश

**ज्या अर्थी**, महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दि. 13 मार्च 2020 चे अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (कोव्हिड 19) उद्भवणा-या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे व या विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपायोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन सुरु करण्यांत आली आहे.त्या अनुषंगाने अकोला जिल्हयामध्ये तसेच राज्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्यायमूळे आपतकालिन योजना करणे गरजेचे असल्यामुळे जिल्हाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. **आणि**

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र. स्पष्टीकरण No.DMU/ 2020/CR.92/DisM-1 दिनांक 29 जून 2020 मध्ये नमूद केल्यानुसार संदर्भीय वाचा क्र. 10 अन्वये **दिनांक** 31.07.2020 **पर्यंत फेस** 1,2,3 प्रमाणे सुरु कराव्याच्या आस्थापनाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करुन लॉकडाऊन चा कालावधी वाढविण्यात आला आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पूनर्वसन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 **दिनांक** 7 **जूलै** 2020 मध्ये Mission Begin Again Phase V नुसार अकोला जिल्हा हा रेड झोन मध्ये समाविष्ट असल्यामुळे अकोला जिल्हयातील दुकाने / आस्थापना **दिनांक 09 जूलै** 2020 रोजी पासून **सकाळी 9.00 ते सायंकाळी 7.00 या कालावधीत दिनांक** 31 **जूलै** 2020 **चे P1-P2** नुसार निर्गमित केलेले आदेश कायम ठेवून सुरु ठेवणेबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत.

**त्याअर्थी** मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला**, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 , व प्राप्त अधिकारानुसार, अकोला जिल्हा हा रेड झोन मध्ये समाविष्ट असल्यामुळे दिनांक 2 जून 2020 रोजी निर्गमित केलेल्या आदेशामध्ये अंशता बदल करुन महाराष्ट्र

शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पूर्नवसन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक 7 जूलै 2020 चे मार्गदर्शक सूचनेनुसार सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष2/प्रस/गृह/कावि-464/2020 दिनांक 02.06.2020 मधील **मुद्दा क्र. 9 (5)** नुसार **कंटेटमेंट झोन प्रतिबंधीत क्षेत्राबाहेरील अकोला शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील दुकाने / आस्थापना सकाळी 9.00 ते सायंकाळी 5.00 पर्यंत सुरु ठेवणे बाबत** आदेशित करण्यात आले होते.

**तथापी**, उक्त आदेशाच्या **मुद्दा क्र.** 9 (5) मधे बदल करुन **कंटेटमेंट झोन प्रतिबंधीत क्षेत्राबाहेरील अकोला शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील दुकाने / आस्थापना आठवडयातील सातही दिवस सकाळी 9.00 ते सायंकाळी 7.00 या कालावधीत दिनांक 2 जून 2020 चे आदेशात नमूद केल्याप्रमाणे P1-P2 यानुसार सुरु ठेवणे बाबतचे** याद्वारे आदेश निर्गमित करीत आहे.

सदरचे आदेश हे **दिनांक 07 /07/2020 चे 00.00 वा. पासून ते दिनांक 31/07/2020 चे 24.00 वा. पर्यंत संपूर्ण अकोला शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील.**

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहिता, (1860 चा 45 ) याच्या कलम 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदरहू आदेश आज **दिनांक 8/7/2020** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलीपी:-**

1. **मा. विभागीय आयुक्त,** *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. **जिल्हा पोलीस अधिक्षक,** अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. **आयुक्त, महानगर पालिका** अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. **उपविभागीय अधिकारी** ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
5. **तहसिलदार** -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
6. **प्रकल्प अधिकारी**, नगर पालिका प्रशासन अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशानुसार संबंधीत मुख्याधिकारी यांना आपलेस्तरावरुन सूचित करावे.
7. **जिल्हा माहिती अधिकारी,** अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

अकोला जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला